# नागपूर सुधार प्रन्यास

स्टेशन रोड, सदर, नागपूर.

(शासकीय राजपत्र दिनांक २.९.२०१० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार व महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचना क्रमांक टिपीएस–२४०९–२८०९–सी.आर.–३५६–०९–यु.डी.–९ दिनांक ३१ ऑगस्ट २०१० अनुसार नागपूर महानगर क्षेत्रासाठी नियुक्त करण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकरण)

## जाहीर सूचना

## नागपूर महानगर क्षेत्रांतर्गत समाविष्ट असणाऱ्या जागा /अभिन्यासांचा विकासासाठी व इमारत बांधकामासाठी अर्ज .

महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक २३.७.१९९९ रोजी अधिसूचना क्र. यु.डी /टिपीएस/१८९९/११९१/सी.आर./८०९९/यु.डी.– १३ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र घोषित करण्यात आले तसेच नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम १९३६ च्या कलम १ उपकलम (२) अन्वये अधिसूचना क्र. एन.आय.टी./२२०२/४०२५/सी.आर.–४९३/२००२ यु.डी.–२६ दिनांक २४.१२.२००२ अनुसार शासनातर्फे नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम १९३६ च्या तरतूदी नागपूर महानगर क्षेत्रासाठी वाढवून लागू करण्यात आल्या व महाराष्ट्र शासनातर्फे नासुप्र अधिनियम १९३६ (सी.पी. ॲन्ड बेरार XXXVI of 1936) अन्वये स्थापित झालेल्या नागपूर सुधार प्रन्यासला, अधिसूचना क्र. टिपीएस–२४०९–२८०९–सी.आर.–३५६–०९–यु.डी.–९ दिनांक ३१ ऑगस्ट २०१० अन्वये नागपूर महानगर क्षेत्रासाठी '' विशेष नियोजन प्राधिकरण '' म्हणून नेमण्यात आले

आहे.  महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २.९.२०१० रोजी सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

(मात्र उक्त क्षेत्रातून नागपूर महानगर पालिका, कामठी नगर परिषद, कळमेश्वर नगर परिषद, कामठी कटक मंडळ व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी ला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून अधिसूचित केलेले क्षेंत्र वगळण्यात आले आहे. )

२.   नागपूर महानगर क्षेत्राचे अधिसूचित क्षेत्रफळ ३५७७.१६ चौ. कि.मि. असून त्यामध्ये नागपूर (ग्रामीण) हिंगणा, पारशिवनी, कामठी, मौदा (पूर्ण क्षेत्र) व सावनेर, उमरेड, कळमेश्वर व कुही (भाग क्षेत्र) समाविष्ट असून या तहसिलींमध्ये एकूण ७२६ गावे समाविष्ट आहेत.  नागपूर महानगर क्षेत्रातील उक्त वगळण्यात आलेल्या क्षेत्राशिवाय उर्वरित क्षेत्रांतील जमीन मालक /अभिन्यास धारक/भूखंडधारक ज्यांच्या जमिनी दिनांक ६.५. २००० रोजी मंजूर करण्यात आलेल्या नागपूर जिल्हयाच्या प्रादेशिक योजनेनुसार निवासी/व्यापारी/औद्योगिक व सार्वजनिक उपयोगाच्या वापरात मोडतात व जे संबंधित त्यांच्या अभिन्यास/ जमिनी विकसित करू इच्छितात, त्यांनी त्यांच्या अभिन्यासांचे नकाशे, मालकीचे दस्तावेज जसे, विक्रीपत्र/पट्टा पंजियन, ७/१२ उतारा प्रत, राजस्व अभिलेख, राजस्व नकाशे, स्थळदर्शक नकाशा, नागरी जमीन कमाल धारणा आदेश, गैरकृषी आदेश इत्यादींसह नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय सदर, नागपूर येथे मंजुरीकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावे, तसेच (अ) ज्या जमीनधारकांच्या जमिनी /अभिन्यास गैरकृषी करण्यात आल्या आहेत, (ब) नगर रचना विभागाकडून ज्यांचे अभिन्यास तातपुरत्या मंजूरीकरिता व आरेखणाकरिता शिफारसी करण्यात आल्या आहेत, त्यांनी सुध्दा त्यांच्या जमिनीचे अभिन्यास नकाशे मंजुरी व विकास करारनामे करण्यासाठी मालकीचे दस्तऐवज

जसे विक्रीपत्र, पट्टा पंजियन, ७/१२ उतारा, राजस्व अभिलेख, राजस्व नकाशे, स्थळदर्शक नकाशे, नागरी जमीन कमाल धारणा आदेश गैरकृषी आदेश इत्यादींसह नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय सदर, नागपूर येथे विहित नमुन्यात अर्ज सादर करावे तसेच त्या जमीनधारकांनी /अभिन्यास धारकांनी/भूखंडधारकांनी ज्यांचे प्रकरणांना गैरकृषी आदेश प्राप्त असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे, त्यांनीसुध्दा त्यांचे अभिन्यास नकाशे विकासाच्या करारनाम्यासाठी मालकीचे दस्तऐवज विक्रीपत्र,पट्टा पंजियन, ७/१२ उतारा, राजस्व अभिलेख, राजस्व नकाशे, स्थळदर्शक नकाशा, नागरी जमीन कमाल धारणा आदेश, गैरकृषी आदेश इत्यादीसह नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय, सदर नागपूर येथे विकास करारनामा करण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावे. जर विकास करारनामाच्या अटीनुसार अभिन्यास धारकांना विकासकामे करावयाची असेल तर त्यांचे विकास कामे नासुप्र मानकाप्रमाणे पुर्ण झाल्यानंतर भुखंडके टप्प्या–टप्प्याने बांधकामाकरिता मुक्त करण्यात येतील. विकास करारनामाच्या अटी नुसार जर नागपूर सुधार प्रन्यासनी अभिन्यासातील विकास करावयाचा असेल तर संबंधित भूखंडांचे आवश्यक ते विकास शुल्क नागपूर सुधार प्रन्यासकडे जमा करण्यात आल्यानंतर संबंधित भूखंड बांधकामासाठी मुक्त करण्यात येतील व त्यानंतरच त्यावरील इमारत नकाशे मंजूर करण्यात येतील.

३. तसेच ज्या जमीनधारक/अभिन्यासधारक/भूखंडधारक यांनी नागपूर सुधार प्रन्यासशी विकासाचे करारनामे केले आहेत व मंजूर अभिन्यास नकाशातील भूखंडावर बांधकाम करू इच्छितात, त्यांनी त्यांचे प्रस्तावित इमारत नकाशे चार प्रतींसह नागपूर सुधार प्रन्यासमध्ये पंजिबध्द असलेल्या परवानाधारक वास्तुविशारद/अभियंते/स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या स्वाक्षरीसह नागपूर सुधार प्रन्यासला मालकीचे आवश्यक दस्तऐवज जसें विक्रीपत्र, पट्टा पंजियन, ७/१२उतारा, राजस्व अभिलेख, राजस्व नकाशे, स्थळदर्शक

नकाशा, नागरी जमीन कमाल धारणा आदेश तसेच नगर रचना मंजूर अभिन्यास नकाशासह तपासणी शुल्क भरून विहित नमुन्यात नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय, सदर नागपूर येथे मंजुरीसाठी सादर करावे.

४. नागपूर महानगर क्षेत्रासाठीचा विकास नकाशा तयार करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. ज्या जमीनधारकांच्या जमिनी/अभिन्यास गैरकृषी झालेल्या आहेत अथवा ज्यांच्या प्रकरणांमध्ये अंतिम मंजुरीचे आदेश प्राप्त झाले आहेत, त्यांनी संबंधित कागदपत्रे नागपूर सुधार प्रन्यासकडे सादर करावीत, जेणेकरून संबंधित जमिनी/अभिन्यास यांचा समावेश नागपूर महानगर क्षेत्राच्या विकास आराखडयात योग्य रितीने करता येईल.

५. अभिन्यास नकाशे/ इमारत नकाशे मंजुरीस सादर करण्याकरिता आवश्यक विहित नमूने तसेच नागपूर महानगर क्षेत्रांतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व गावांची यादी नागपूर सुधार प्रन्यासच्या सदर स्थित मुख्य कार्यालयात तसेच नागपूर सुधार प्रन्यासच्या संकेत स्थळावर www.nitnagpur.org येथे उपलब्ध आहे विहित नमुन्याचे अर्ज नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर येथे रू. २०/— शुल्कावर विक्रीसाठी उपलबध आहे. वरील अर्ज नागपूर सुधार प्रन्यास मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर येथील नागरीक सुविधा केन्द्रावर स्विकारल्या जातील.

६. नागरीकांच्या सोयींकरिता नागपूर सुधार प्रन्यास तर्फे नागपूर महानगर क्षेत्राचे ४ (चार) विभाग करण्यात आलेले आहेत. या विभागाचे विकास कामाकरिता व बांधकाम तक्रारी इत्यादीसाठी खालील कार्यालयाशी संपर्क साधावे.

| विभाग | तहसिल | कार्यालयाचा पत्ता | संबंधित अधिकारी | कार्यालय दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| पूर्व | कामठी व मौदा | नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय (पुर्व), सुर्यनगर, नागपूर | विभागीय अधिकारी (पूर्व) व<br>कार्यकारी अभियंता (दक्षिण—पूर्व)<br>नागपूर सुधार प्रन्यास | ०७१२—२६८१००९ |
| पश्चिम | कळमेश्वर व हिंगणा | नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय (पश्चिम), सांस्कृतीक संकुल नॉर्थ अंबाझरी रोड, नासुप्र जलतरण तलावासमोर, अंबाझरी, नागपूर | विभागीय अधिकारी (पश्चिम) व<br>कार्यकारी अभियंता (उत्तर—पश्चिम)<br>नागपूर सुधार प्रन्यास | ०७१२—२२३२२८२ |
| उत्तर | पारशिनी व सावनेर | नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय (उत्तर), वैशाली नगर, पांचपावली, नागपूर | विभागीय अधिकारी (उत्तर) व<br>कार्यकारी अभियंता (उत्तर—पश्चिम)<br>नागपूर सुधार प्रन्यास | ०७१२—२६४०३६६ |
| दक्षिण | नागपूर (ग्रामीण), उमरेड व कुही | नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय (दक्षिण), क्रिडा चौक, हनुमान नगर, नागपूर | विभागीय अधिकारी (दक्षिण) व<br>कार्यकारी अभियंता (दक्षिण—पूर्व)<br>नागपूर सुधार प्रन्यास | ०७१२—२७४४५२४ |

७.		तसेच नागपूर सुधार प्रन्यासच्या परवानगीशिवाय करण्यात येणारी कोणतीही विकासकामे अथवा इमारतींचे बांधकाम हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

अधीक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास.